सोलापूर
प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून प्रकाशित
POSTAL REG NO. SLP/32/2015-2017
तारा | शनिवार, दि. ९ डिसेंबर २०१७ | युगाब्द ५११९ | शिवशक ३४४ | पाने ८ | किंमत ४ रुपये | वर्ष २ रे अंक १०४

डी. पी. भोसले ग्रंथालय कोरेगाव

## 'डी.पी.भोसले'च्या विद्यार्थ्यांची बॅडमिंटनमध्येही चमकदार कामगिरी

**कोरेगाव, ८ डिसेंबर**

सातारा येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठांतर्गत बॅडमिंटन स्पर्धेत डी. पी. भोसले महाविद्यालयाच्या खेळाडूंनी यश संपादन केले आहे. २४ नोव्हेंबर रोजी आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज सातारा येथे ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

अत्यंत अटीतटीच्या झालेल्या या स्पर्धेत विविध महाविद्यालयांना धूळ चारत असताना विभागाचे अजिंक्यपद कोरेगावच्या डी. पी. भोसले कॉलेजच्या खेळाडूंनी मिळवले. या अभूतपूर्व यशासोबतच शिवाजी विद्यापीठासाठी या कॉलेजचा संघ निवडण्यात आला. या संघात गणेश सकपाळ, सनी यादव, शशिकांत माने हे खेळाडू होते. संघाच्या निवडीसोबतच सर्वोत्तम खेळाडूंचा बहुमान डी. पी. भोसले कॉलेजचा खेळाडू अर्थव चव्हाण यास मिळाला.



**कोरेगाव : यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करताना मान्यवर.**

पहिल्यांदाच महाविद्यालयाला बॅडमिंटन स्पर्धेमध्ये असे यश मिळाले आहे. कॉलेजच्या या यशामुळे सर्व स्तरातून खेळाडूंचे अभिनंदन होत आहे. या सर्व खेळाडूंना प्राचार्य डॉ, विजयसिंह सावंत तसेच फिजिकल डायरेक्टर बी. डी. भोसले यांनी मार्गदर्शन केले. रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील, सचिन डॉ. बी. के. कराळे यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. दरम्यान, महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघानेही विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

**तभा प्रतिनिधी**